REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 11 | AUGUST - 2022

# समग्र शिवाजी महाराज
# छत्रपती शिवाजी महाराज : मध्ययुगीन भारतातील थोर मानवतावादी लोककल्याणकारी जाणता राजा

**Dr. Afroz Hanif Sheikh**
**Professor and HoD History, S. B. City College, Nagpur.**



मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक दैदिप्यमान तारा म्हणजे दक्षिणेतील छत्रपती शिवाजी महाराज होय. दक्षिण भारताच्या राजनीतित मराठ्यांचा उदय आणि मराठा राज्याची स्थापना भारताच्या इतिहासातील सुवर्णक्षरांनी लिहिल्या गेली आहे.

भोसले घराण्याच्या उदयाबरोबरच महाराष्ट्र राज्याच्या इतिहासाला खऱ्या अर्थाने प्रारम्भ झाला.[१] असे म्हटल्यास अतिश्योक्तिपूर्ण ठरणार नाही. उत्तर भारताच्या राजपूतान्यातील उदयपूर येथील सिसेदिया (राणा) वंशामधून भोसले वंशाची निर्मिती झाली।[२] छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजांमध्ये मालोजी व शहाजी हे अत्यंत पराक्रमी पुरुष होते. तत्कालीन राजनीतीत आपल्या कौशल्याचे दिग्दर्शन करीत शहाजी राजे अहमदनगरच्या निजामशाहीत व नंतर विजापूरच्या आदीलशाहीत कार्यरत होते. हिंदवी स्वराज्याची स्थापना करावयाची प्रेरणा शिवाजी महाराजाना आपल्या वडीलांकडून म्हणजेच शहाजी राजा यांच्याकडून मिळाली.[३] शिवाजी महाराजांना 'स्वराज्य संस्थापक' म्हटले तर शहाजी राजांना 'राज्य संकल्पक' म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.[४] तसेच तत्कालीन विद्वान इतिहासकारांनी शिवाजी महाराजांच्या वडीलांना शहाजी राजांना 'राज –निर्माता' (Kingmaker) ही पदवी दिली आहे.[५]

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या श्री शिवछत्रपतीचा जन्म १९ फ्रेबुवारी १६२७ मध्ये शिवनेरी किल्ल्यावर झाला बालमनावर संसकार निर्माण करण्याचे कार्य आई राणी जिजाबाईंनी व गुरु दादोजी कोडादेव यांनी केले. शेजवलकरांच्या शब्दात 'शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेचे मुख्य श्रेय त्याच्या स्वतःच्याच स्फुर्तीला कल्पनेला व पराक्रमाला देणे योग्य आहे असे वाटते. इतिहासात अनेक शतकांनी एखादा स्वयंभू नेता जगाच्या पाठीवर कोठेतरी केव्हातरी एकदम उदय पावताना दिसतो. त्या जातीचा शिवाजी आहे. शिवाजीचे स्वतंत्र मन त्यांच्या स्वतंत्र राज्याचे अधिष्ठान होते.[६]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधी महाराष्ट्रात सन्तांनी सूरु केलेल्या भक्ति आंदोलनाच्या अथांग सागरामध्ये समाजातील वर्ण व वर्गभेदाची धार बोथट झाली होती. त्याचा फायदा छत्रपती शिवाजींच्या संगठन कौशल्याला मिळाला. मराठ्याच्या राज्याचे संस्थापक ह्या नात्याने शनिवार ६ जून १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक केला. त्यामुळे ते मराठा राज्यांचे सार्वभौम शासक बनले आणि मराठ्यांच्या राज्याला कायदेशीर (वैधानिक) मान्यता मिळाली.[८]

इ. सन १६७४ मध्ये राज्याभिषेक झाल्यानंतर तो ही स्वकीय आणि तत्कालीन धर्ममार्तडांचा विरोध पत्करुन शिवाजींनी मिळालेली बिरूदे त्यांच्या राजकीय उद्दिष्टांची साक्ष देतात. 'राज्य ही व्यकितगत मालमत्ता नसून प्राणी वर्गापासून

विद्वान ब्राह्मणांपर्यत सर्व सामाजिक घटकांचे प्रतिपालन करणे, संरक्षण देणे, त्यांचे दैनंदिन जीवन आनंदमय करणे व धर्मानुसार राज्य करणे ही 'लोककल्याणकारी' संकल्पना त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणली होती. राजा हा प्रजेचा उपभोगशून्य स्वामी असला तरी राज्य हे 'बहुजन हिताय व बहुजन सुखाय' ह्या गौतम बुध्दांच्या शिकवणीनुसार चालविले पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती आणि म्हणूनच शिवाजी महाराज एक थोर मानवी दृष्टीकोण असलेला राजा होता, असे म्हणावे लागते. त्यांनी स्थापन केलेले राज्य त्यांच्या अपार कष्टाच्या स्वपराक्रमाची व अतुलनीय शौर्य आणि धैर्य द्रष्टेपणाची साक्ष देते.

अपार जनशक्तिच्या आधारावर व सामर्थ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी हिन्दवी स्वराज्याची स्थापना केली होती[९]. त्यांनी आपल्या कार्यकाळात स्वातंत्र्याची भावना निर्माण करुन, सर्वसाधारण मनुष्यांपर्यंत पोहचवून इ. स. १८१८ पर्यंत पेटत ठेवली. त्यामुळेच भारतीय राष्ट्रवादी भावनेचा उदय आणि विकास झाला.[१०] शिवाजी महाराजांनी स्पष्ट केले की वास्तविक सवरुपात हिंदु धर्माचा वृक्ष वाळला नसून अनेक शतकांच्या राजकीय गुलामगिरीच्या खाली दबलेला होता. पून्हा त्या वृक्षामधून नवीन पालवी (छोटी पाने) निघून आकाशात उंच भरारी घेऊ शकतो.[११]

छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाद्वारे कुशलप्रशासक होते, याची ग्वाही दिली. तसेच चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य ह्या राजस्व प्रणाली द्वारे आपल्या संपूर्ण स्वराज्यावर तसेच परकीयांवर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. शिवाजी महाराजांनी आपल्या कारकीर्दित तांब्याच्या नाणी 'शिवराई' व सोन्याची मुद्रा 'होन' (होण) प्रचलनात आणून हे सिध्द केले की त्यांच्या साम्राज्यात सुख व समृद्धीचा वास होता.

१६ व्या शतकांपर्यत भारताच्या समुद्रीकिनाऱ्यावरील प्रदेशांवर पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज ह्या परकीय लोकांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करुन भारतीय अस्मितेला धक्का पोहचविला होता. १७ व्या शतकात उत्कर्षास आलेले छत्रपती शिवाजी हे पहिले भारतीय शासक होते. ज्यांनी समुद्र किनाऱ्याचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या आरमारात (नौशक्ती) वृध्दि द्वारे शत्रूंशी संघर्ष करुन त्यांच्यावर आपला दरारा बसविला.[१२] गुरिल्ला युध्द पध्दती किंवा छापामार युध्द तंत्राने त्यांनी अफजलखान, शाहिस्तेखान ,औरंगजेब, सिद्दी सारख्या शत्रूंवर मात करुन त्यांना नामोहरम केले.

सम्राट अशोकाने विशाल साम्राज्याच्या निर्मितीनंतर बौध्द धर्माचा आधार घेऊन कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केला. सम्राट अकबराने मध्ययुगात 'सुलह-ए-कूल' शांतीचा मार्ग साधून एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला. यांच्या तुलनेत छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन व कर्तृत्व हे मात्र वेगळे होते. ''कुळवाडी भूषण रयतेचा राजा'' अशी शिवाजी महाराजांची ओळख होती. म्हणूनच महात्मा ज्योतीबा फूले यांनी त्यांच्यावर दीर्घ पोवाडा रचला आणि महाराजांना कुळवाडी भूषण 'रयतेचा राजा' म्हणून गौरविले. राज्यकारभार चालवितांना त्यांनी 'सर्वधर्मसमभाव' बाळगुन सर्वांना समान व योग्यतेप्रमाणे वागणूक दिली इथे त्यांचा मुत्सद्दीपणा व दूरदर्शिता हमखास जाणवते.[१३] प्रजा कुठल्याही धर्माची, पंथाची असो तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण मानवीय असला पाहिजे अशी त्यांची विचारसरणी होती. म्हणूनच त्यांनी प्रजा महाराजांवर अतूट विश्वास, प्रेम ठेवून त्यांच्याशी एकनिष्ठ होती. परधर्माची युध्दात सापडलेली स्त्री, मुले व 'कुराण' (मुसलमानांचा धर्मग्रंथ) आदरपूर्वक परत करणारा हा पहिला हिंदू शासक होता. म्हणूनच प्रजाहितदक्ष, बहुजनकल्याणकारी, लोकाभिमुख राज्यकारभार करणारा राजा म्हणून शिवाजी महाराजांची इतिहासात गणना केले जाते.

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाने राज्य करणे हे लोकशाहीत अभिप्रेत आहे. ही मानवीय मूल्ये जपण्याचा शिवशाहीत आटोकाट प्रयत्न करण्याचे महान कार्य छत्रपती शिवाजींनी केले. म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची 'शिवशाही' ही खऱ्या अर्थाने 'लोकशाही' होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतीय इतिहासकार सर जदुनाथ सरकार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना ''आधुनिक युग प्रवर्तक राष्ट्रप्रमुख'' म्हणून गौरव केलेला आहे. त्यामुळेच शिवाजी महाराजांना केवळ महाराष्ट्रपूरतेच मर्यादित ठेवणे योग्य नसून 'भारताच्या इतिहासातील एक महान राजा' अशा स्वरुपात उल्लेख करणे, मला योग्य वाटते. आजही त्यांच्या कृतीतून व्यवहारातून मिळणारी प्रेरणा आजच्या नवीन पिढीसाठी महत्वाची ठरते.

प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्याख्यानामध्ये फक्त तीनच गोष्टी सांगितल्या जातात व आम्ही सर्वांनी ते ऐकलेत..........!

१. अफजलखानाचा वध
२. शाहिस्तेखानावर हल्ला करून बोटे छाटली
३. आगऱ्याहून स्वतःची सुटका केली.

पण मला भोवलेले शिवाजी महाराज अनेक अंगाने समजून घ्यावे वाटतात......!

१. आपल्या आईला वडिलांच्या मृत्यूनंतर सती जाण्यापासून रोखणारे छत्रपती शिवाजी महाराज 'सामाजिकक्रांती' चे प्रणेते होते.
२. रयतेच्या शेतीतील पिकांना हात लावता कामा नये हा आदेश देणारे ''लोकपालक'' राजे होते.
३. सर्वप्रथम जमिनीची मोजणी करून नोंद ठेवण्याच्या पध्दतीला सुरु करणारे''उत्तम प्रशासक'' होते.
४. विनाकारण व विना मोबदला झाड तोडल्यास नवीन झाड लावून जगवण्याची शिक्षा देणारे ''पर्यावरण रक्षक''होते.
५. 'समुद्रप्रवास केल्याने हिंदू धर्म भ्रष्ट होतो', ही विचारसरणी नष्ट करुन धर्माचा विरोध पत्करुन 'उत्कृष्ट आरमार' व किल्ले उभारणारे ''स्वधर्मचिकित्सक'' होते.
६. मुहूर्त न पाहता, अशुभ मानल्या गेलेल्या अमावस्येच्या रात्री सर्व लढाया जिंकणारे 'अंधश्रध्दा निर्मुलनाचासंदेश देणारे चिकित्सक राजे' होते.
७. ३५० वर्षापूर्वी शिवरायांनी सुरु केलेली शिवकालीन पाणी साठवण व्यवस्था आजही प्रभावी आहे म्हणून''उत्तम जलतज्ञ व भूगर्भशास्त्रज्ञ'' ही होते.
८. तीन साढे तीन शतकापूर्वी दळणवळणाचे कोणतेही साधन नसतांना अभेद्य असे ३०० हून जास्त किल्लेनिर्माण करणारे, ''उत्तम अभियंते''होते. म्हणूनच त्यांना 'इंजिनिअरचा गुरु' असे म्हटले आहे.
९. सर्व जाती धर्मातल्या मावळ्यांना समान न्याय व योग्यतेप्रमाणे संधी देत सामाजिक समानता निर्माण करणारे''परधर्मसहिष्णू राजा'' होते.
१०. पर स्त्री मातेसमान मानत महिलांना सन्मानाने वागवणारे ''मातृभक्त, नारीरक्षक छत्रपती 'शिवराय' होते.

शिवरायाचे आठवावे रुप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप ।।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।


१) सभासद कृष्णाजी अनंत कृत 'शिवकालीन अखर (संपा) वी. एस. वाकसकर पृ. क्र. ९५
२) शि. ब. ४६ (कवी जयरात पिंड्यांनी आपल उया राधामाधवविलासचंपू मध्ये शहाजी राजांना सिसोदिया वशांचे म्हटले आहे.)
३) सरदेसाई गो. स. मराठो का नवीन इतिहास खंड १ पृ. क्र. ७४ (१९४६)
४) राजवाडे वि. का. राधा–माधव– विलासचंपू (संपा) पृ. क्र. ३२ (वरील काव्याच प्रास्ताविक मध्ये राजवाडे यांनी म्हटले आहे की, शहाजी राजांनी जवळ जवळ स्वतंत्र राज्य स्थापिले होते, शहाजी हा सिंहासनाधिश्वर व छत्रपती नावाने झाला नसला तरी कृतीने झाला होता)
५) सरदेसाई गो. स. मराठे का इतिहास (१९५७) पृ. क्र. ६१
६) शेजवलकर श्री शिववछत्रपती पृ. ५२
७) माचवे डॉ. प्रभाकर छत्रपती शिवाजर महराज पृ. क्र. –१०.
८) Takakhav N. R. Life of Shivaji Vol II P. N. 350
९) सरदेसाई गो. स. Main currents of Maratha History. अनुवादिका रामेश्वरीदेवी श्रीवास्तव प्र. क्र. ६६
१०) सरदेसाई १.३३३
११) उपरोक्त २८८ (सर जदूनाथ सरकारांच्या सुदंर शब्दांचे वर्णन सरदेसाई यांनी आपल्या पुसतकात केले आहे)

१२) लुनिया बी. एन. मराठा प्रभुत्व (लक्ष्मी नारायण अग्रवाल) द्वितीय संस्करण, १९९१–९२ प्र. क्र. ४६६
१३) सर्वधर्म समभावी – छत्रपती शिवराय, ऑल दंडिया सेक्युलर फोरम मुंबई, प्रथम आवृत्ती १ मे २०१०